उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

उन्नती संस्थेद्वारा प्रकाशित -

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**
**पत्र ४, महिना – मार्च २०१७**

# बिडे वार्तापत्र

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

========================

## आमचे मास्तर बोर्डाच्या परीक्षेला जातात.

तेल्हारा तालुक्यातील झुमरीतलैय्या गावातील गावकरी म्हणत होते, "आमचे मास्तर दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेला जातात," पण परीक्षा द्यायला का, तिथे कामासाठी जातात, ते मात्र माहित नाही, कारण तसेच होते, सायंकाळी गावात लोकांशी चर्चा करीत असतांना गावकरी सांगत होते, कि आमच्या गावात पहिली ते चौथी पर्यंतची शाळा आहे, जवळपास ३० मुलं शाळेत आहेत, दोन मास्तर शिकवायला, त्यातही मुख्याध्यापक नेहमी लेखी काम करीत राहतात, आणि दुसरे मास्तर आहेत, तर ते रोज कधीही येतात आणि कधीही जातात, पण आता तर दहावीच्या बोर्डाची परीक्षा सुरु झाली, ते मास्तर आता येतच नाहीत. मग मुख्याध्यापक तर लेखी काम करतात, आमची मुले कधी आणि कशी शिकणार. तर तुम्ही शिक्षकांशी कधी या विषयावर बोलले नाहीत का ? त्याविषयी गावकरी म्हणाले कि सर्व पालकांसमोर शिक्षकांशी आम्ही बोललो, तेव्हा त्यांनी त्यांची चूक मान्य केली, पुढील काही दिवस वेळेवर आलेत, पण पुन्हा जैसे थे. यावर्षी ज्या ठिकाणी ४ थी पर्यंत शाळा आहे, त्याठिकाणी ५ वी चा वर्ग आणि ज्या ठिकाणी ७ वी चा वर्ग आहे, त्याठिकाणी ८ वी चा वर्ग सुरु होणार आहे, म्हणे. आता आम्हांला सांगा काय उपयोग आहे मग ५ वी चा वर्ग सुरु होऊन.

============================

शिक्षक कधीही येतात आणि कधीही जात असतील तर हे खूप चुकीच आहे, **शिक्षण हक्क कायद्याच्या अनुसूची नुसार** इयत्ता १ ली ते ५ वी वर्गासाठी वर्षाचे २०० दिवस शाळा भरेल, यासाठी शिकवण्याचे घड्याळी ८०० तास असतील, तसेच ६ वी ते ८ वी करिता २२० दिवस शाळा भरेल, यासाठी शिकवण्याचे घड्याळी १००० तास असतील, शिक्षकांचे कामाचे तास दर आठवड्याला ४५ तास असतील, म्हणजे सोमवार ते शुक्रवार ८ तास आणि शनिवारी ५ तास, शाळेत अथवा शैक्षणिक कामासाठी उपस्थित असणे आवश्यक आहे. याकरिता शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत विषय काढायला हवा, तरी उपयोग होत नसेल तर मग वरिष्ठांना कळवायला हवे. तसेच लेखी कामासाठी वेगळा वेळ असतो, म्हणून शिकवण्याच्या वेळेत शिक्षकांनी शिकवलेच पाहिजे. तसेच जि. प. च्या शिक्षकांना बोर्डाच्या परीक्षेचे काम नसते, पण कधी जर शासकीय आदेशानुसार जात असतील तर तसा आदेश हा मुख्याध्यापकांना दाखवून त्यांची परवानगी घेऊन मगच जाता येत.

## फक्त लिहिता वाचता येणे म्हणजे शिक्षण का ?

सध्या ज्ञानरचनावादाप्रमाणे सर्व जि. प. शाळांमध्ये फरशा रंगविणे, साहित्य जमविणे वापरणे, इत्यादी गोष्टी

फार मोठ्या प्रमाणावर झाल्या. त्यानुसार आता शिक्षक मुलांना शिकवीत आहेत. मी तेल्हारा तालुक्यातील झुमरीतलैय्या गावातील मुख्याध्यापकांशी बोलत होतो, तर मुख्याध्यापक सांगत होते कि आमच्या शाळेतील दोन तीन विद्यार्थी अपवाद सोडले तर सर्व विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येते. मग मी वर्गात शिरलो, तर फरशा रंगवलेल्या भिंती रंगवलेल्या दिसल्या, मी पाहत होतो आणि विचार करीत होतो कि फक्त फरशांवर आणि भिंतींवर मुलं कशी शिकतील, शाळेत साहित्य काहीही नव्हते, याविषयी शिक्षक सांगत होते, कि मुलांना त्याची गरज पडत नाही, खडू आणि फळा आहे ना, बस झालं.

मला प्रश्नच पडला, ज्ञानरचनावाद म्हणजे काय म्हणावे नेमके, कारण मुलं कधी लवकर शिकतं, जेव्हा त्याला आनंद वाटेल तेव्हा मग त्यासाठी साहित्य हवं. भाषा शिकण्यासाठी अक्षर, शब्द, वाक्य, उतारा, गोष्ट, पुस्तके इत्यादींची गरज असते, तसेच गणितासाठी परिसरातील खडे, काड्या, कलेसाठी रंग, कागद, शारीरिक विकासाठी, खेळ, मनोरंजनासाठी गाणी, कुतूहल, गोष्टी इत्यादी प्रकारे साहित्य आणि त्याच्या वापर असेल तर मुलं चांगलं शिकेल आणि त्याचा परिपूर्ण क्षमतांचा विकास होईल, पण येथील चित्र वेगळच होत, येथे फक्त मुलांना लिहा वाचायला शिकवलं जात, शासनाला सुद्धा हेच अपेक्षित आहे, लिहिता वाचता येते म्हणजे मुलं प्रगत झाली.

पण अकोट तालुक्यातील झुमरीतलैय्या गावातील जि प शाळेच्या सहाय्यक शिक्षिका मात्र नुसताच लिहियला आणि वाचयला शिक्षण म्हणत नाही, तर मुलांचा परिपूर्ण विकास म्हणजे शिक्षण अस ते सांगतात, त्यासाठी ते शाळेत मुलांना आनंद वाटेल आणि मुलं स्वता शिकतील अशी रचना त्यांनी केली आहे, त्यासाठी कला, गाणे, खेळ, ग्रंथालय, सहलींचे आयोजन, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन हे मुलं स्वताच करतात, शिक्षक फक्त सहकार्य करतात. त्यामुळे शाळेतील उपस्थिती वर्षभर १००% असते. मुलांचा सर्वांगीण विकास होतो. हे खरे शिक्षण प्रत्येक आई - वडिलांना अपेक्षित असाव नाही का ?

एका प्रसिद्ध विचारवंताने मुलांच्या शिकण्याविषयी म्हटले आहे कि,

**'मासे पोहतात, पक्षी उडतात तितक्याच नैसर्गिकपणे माणूस विचार करतो आणि शिकतो. म्हणून मुलांना शिकण्यासाठी कुणी प्रवृत्त करण्याची गरज नाही. आपण फक्त एवढंच करायला हवं कि, जितकं शक्य आहे तितकं बाहेरचं जग शाळेत आणायला हवं. जेव्हा मुलं मागतील, फक्त तेव्हाच त्यांना सल्ला द्यायला हवा, मुलांना जेव्हा तुमच्याशी बोलावंसं तेव्हा त्यांना आदरानं ऐकायला हवं आणि त्यांच्या वाटेतून बाजूला व्हायला हवं. बाकी सगळं त्याचं ते छानच करतील यावर विश्वास ठेवावा.'**

**- जॉन होल्ट**



## ध्येयवादी शिक्षकांच्या संघर्षकथा

शिरीन कुलकर्णी

गटशिक्षणाधिकारी नामदेव माळी यांनी संपादित केलेले आणि साधना प्रकाशनने प्रकाशित केलेले 'आठ प्राथमिक शिक्षकांची आत्मवृत्तं' हे पुस्तक म्हणजे छोट्या छोट्या गावांमध्ये असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळांनी केवळ टिकाव धरावा यासाठीच नव्हे, तर टिकाव धरून विविध क्षेत्रांत उत्कर्ष साधण्यासाठी शिक्षकांनी केलेल्या विलक्षण संघर्षांच्या नवलकथा आहेत.

जर माणसाच्या अंगी समर्पितपणाने काम करण्याची वृत्ती असेल, स्वतःच्या कामाविषयी प्रेम आणि श्रद्धा असेल तर तो काय चमत्कार घडवून दाखवू शकतो याचे प्रत्यंतर या आत्मवृत्तांमधून येते. हा चमत्कार समाजापर्यंत पोहोचवण्याचे मोलाचे कार्य गटक्षिणाधिकारी नामदेव माळी यांनी केले आहे. या शिक्षकांना लिहिते करण्याचे संपूर्ण श्रेय त्यांचे आहे. या शिक्षकांचे काम लक्षात घेऊन ते समाजापर्यंत जावे म्हणून माळी यांनी या शिक्षकांच्या लेखन कार्यशाळा घेतल्या, त्यांना लिहिण्यासाठी प्रोत्साहित केले आणि त्यांच्या लेखनाची संस्करणेही करायला लावली.

आपले काम नाइलाजाने करणारे, कामे टाळण्याचा प्रयत्न करणारे कामचुकार सर्वच क्षेत्रांमध्ये भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे कामे करणाऱ्यांचे काम झाकोळते. माळी यांनी प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे, या पुस्तकात उल्लेखिलेल्या प्रत्येक शाळेवर स्वतंत्र पुस्तक तयार होऊ शकते. पण शिक्षकांनी किमान स्वतः केलेल्या प्रयत्नांचे यथायोग्य चित्रण करावे, यासाठी स्वतःचे आणि स्वतःच्या कामाचे विश्लेषण व विच्छेदन करण्यासाठी त्यांनी त्यांना दैनंदिनी लिहायला लावली आणि त्यातून हे लेख आकार धरू लागले.

प्रथम उल्लेख करायला हवा तो कृष्णात पाटोळे या समडोळी या ठिकाणी असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत काम करणाऱ्या शिक्षकाचा. परिपाठ संगीतमय करण्यापासून ते पालकांचे समुपदेशन करण्यापर्यंत, शाळेच्या उजाड माळाचे हिरव्यागार वनराईत रूपांतर करण्यापासून आणि त्यासाठी मडकासिंचन पद्धती वापरण्यापासून ते मुलांना हळूहळू विश्वासात घेऊन मुलांच्या व शाळेच्या विविध समस्या सोडवण्यापर्यंत अनेकानेक कामे पाटोळे यांनी केली. इतकेच नव्हे, तर कितीही समर्पित भावना असलेला शिक्षक जे करू शकणार नाही असे तुंबलेले शौचालय त्यांनी स्वच्छ केले. मुलांना वाचनाची सवय लावण्याबरोबरच इंग्रजी व गणित सुधारण्यासाठी वेगवेगळे नावीन्यपूर्ण उपायही त्यांनी योजले. विविध खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळवावे म्हणून कष्ट घेणे, शाळेत इतिहासाचा कक्ष चितारणे, इत्यादी विविध उपक्रमांबरोबरच अपंग समावेशित शेतीशाळाही सुरू केली.

सानप वस्तीतल्या शाळेविषयी लिहिणाऱ्या देवके सरांनी ते स्वतः शाळेत दाखल होण्यापूर्वीची शाळेची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. प्रत्येक वर्गात आरसा, कंगवा, नेलकटर, खोबरेल तेल, साबण, दंतमंजन इत्यादी सामान ठेवलेले असे. मुलांच्या शारीरिक स्वच्छतेची कामे गुरुजी स्वतः करत असत. एका ज्येष्ठ शिक्षकाचे आव्हान स्वीकारून देवके सरांनी अत्यंत कष्ट घेतले आणि शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवून दाखवले. शाळेत परसबाग तयार करणे, त्यासाठी खत तयार करणे यांसारखे अनेक उपक्रम राबविले.

अमोल शिंदे यांनी आडबाजूला असलेली शाळा आनंदाने स्वीकारून शाळेसाठी धडपडायला सुरुवात केली. आईच्या मृत्यूनंतर आठ वर्षांच्या मुलीने आपल्या तीन लहान बहिणींना- पैकी एक मतिमंद- कसे सांभाळले आणि शाळेने त्यांना कशी मदत केली, याची हकिकत सांगितली आहे.

सुरेश कदम यांची गोसावी लोकांच्या वस्तीतली शाळा, सुखदेव बंडगर यांची नंदीवाले वस्तीतली शाळा, सचिन पाटील यांची सोनी गावची शाळा, श्रद्धा कुलकर्णी यांची मौजे डिग्रज येथील शाळा... या सर्व शाळांचे अनुभव थोड्याफार तपशिलांच्या फरकाने सारखेच आहेत. या सर्व शिक्षकांमध्ये एक समान सूत्र दिसते; ते असे की या सगळ्यांचे शिक्षणावर, विद्यार्थ्यांवर अगदी हृदयाच्या गाभ्यापासून प्रेम आहे आणि आपल्या कामाबद्दल त्यांच्या मनात नितांत श्रद्धा आहे. आपल्या कामाशी ते अत्यंत एकनिष्ठ आहेत.

नामदेव माळी यांच्या पाठबळामुळेच हे शिक्षक कामे करू शकले आणि लिहिते झाले. आज माळी यांच्यासारखे शिक्षणाधिकारी आणि त्यांनी घडविलेल्या शिक्षकांसारखे शिक्षक शिक्षणक्षेत्रात असतील तर पुढची पिढी ही जबाबदार नागरिकांची नक्कीच असेल. शिक्षण क्षेत्रातल्याच नव्हे, तर प्रत्येक संवेदनशील व्यक्तीला प्रेरणा देऊ शकेल असे हे पुस्तक आहे. म्हणूनच त्याचे सामाजिक मूल्य फार मोठे आहे.

*'आठ प्राथमिक शिक्षकांची आत्मवृत्तं',*
*संपादक- नामदेव माळी,*
*साधना प्रकाशन,*
*पृष्ठे- १२८, किंमत- १२५ रुपये.*
■ shirin511@gmail.com

पालकांनो यावर्षापासून ५ वी आणि ८ वी चा वर्ग सुरु होत आहेत. त्याकरिता आपल्या गावात ४ थी पर्यंत शाळा असेल तर ५ वी चा वर्ग सुरु होईल, आणि ७ वी पर्यंत शाळा असेल तर ८ वी चा वर्ग सुरु होईल, त्यामुळे तुमचे मुलं जर ५ वी ला किंवा ८ वी ला जात असणार तर गावातील जि. प. शाळेतच त्यांना शिकू द्या.